जाहीर सूचना

सूचित करण्यात येते की, (१) श्री. संजय जगुभाई पटेल आणि (२) सौ. जयंश्री संजय पटेल, हे दोघेही भारतीय वंशाचे, अमेरिकेचे नागरिक असून त्यांचा पत्ता १५६०१ मीडोगेट रोड, एन्सिनो, सीए ९१३५६ असा आहे. त्यांनी खाली नमूद केलेला त्यांचा फ्लॅट व कार पार्किंग जागा (यापुढे एकत्रितपणे **''सदर मिळकत''**), जी खालील परिशिष्टामध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेली आहे, सर्व प्रकारचे बोजे, गहाण, न्यायप्रविष्ट वाद यांपासून मुक्त तसेच स्पष्ट व विक्रीयोग्य हक्कनाम्यासह माझ्या अशिलांना विकण्यास आणि/किंवा हस्तांतरित करण्यास सहमती दर्शविली आहे.

सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागासंबंधी वाटप, करार, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेकरार, उपभाडेकरार, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, गहाण (समन्यायी किंवा अन्य प्रकारचे), भेट, धारणाधिकार, भार, न्यास, वारसा, देखभाल, सुखभोगाधिकार, मृत्युपत्राद्वारे मिळालेला वारसा, ताबा, अभिहस्तांकन, परवाना, डिमाईज, मृत्युपत्राद्वारे मिळालेला लाभ, वाटणी, भार, गहाण ठेव, हमी, भागीदारी, कर्ज, आगाऊ रक्कम, संपादन, बोजा, मनाई आदेश आणि/किंवा कोणत्याही जप्तीखाली किंवा कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण (लवाद न्यायाधिकरणासह), महसूल प्राधिकरण किंवा वैधानिक प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही न्यायनिर्णय, हुकूमनामा, आदेश किंवा निवाड्याअंतर्गत किंवा कायद्याच्या अंमलबजावणीमुळे अथवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, हक्कनामे, इस्टेट, हिस्सा किंवा स्वारस्य असलेली व्यक्ती आणि/किंवा सदर फ्लॅट व कार पार्किंग जागेसंबंधीच्या मूळ मालकी हक्काच्या कागदपत्रांचा ताबा असलेली कोणतीही व्यक्ती यांनी, त्यासंबंधीच्या समर्थक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात, खाली सही करणाऱ्यास त्यांचे कार्यालय क्र. २०५ (२२अ), दुसरा मजला, सर युसुफ बिल्डिंग कॉन्डोमिनियम, वीर नरिमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे, या सूचनेच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावे. अन्यथा, सदर मिळकतीची विक्री अशा कोणत्याही दावा किंवा स्वारस्याची दखल न घेता पूर्ण करण्यात येईल आणि असा दावा, असल्यास, सर्व हेतू व उद्देशांसाठी त्याग केलेला मानण्यात येईल.

सदर मिळकतीचे परिशिष्ट

मालकी हक्काची मिळकत म्हणजे **''टेन बीकेसी''** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या विंग-डब्ल्यू९ मधील १४ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १४०१, एम.आय.जी. कॉलनी, गांधी नगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ येथे स्थित असून, सर्व्हे क्र. ३४१ (भाग), त्यास अनुरूप सीटीएस क्र. ६४९ (भाग) व ६४९/१ ते ६४९/४८, गाव वांद्रे (पूर्व), महानगरपालिका ''एच'' विभाग (पूर्व), तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथील जमिनीवर बांधलेला आहे. सदर फ्लॅटचे रेरा चटई क्षेत्र ६८.८० चौ. मीटर असून त्यासोबत १ (एक) कार पार्किंग जागा आहे.

दिनांक : ०१ ऑगस्ट, २०२६.

(धिरेन एच. शाह)
अधिवक्ता व सॉलिसिटर

सेन्ट्रल बँक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
CENTRAL TO YOU SINCE 1911

प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर
पी-५६, एमआयडीसी नागापूर, अहमदनगर-४१४१११
फोन-०२४१-२७७९०८०

ई-लिलाव विक्री सूचना (सरफैसी ॲक्ट-२००२ अंतर्गत)
जोडपत्र-IV-ए, नियम ८(६) तरतुद पहा

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) सहवाचता ९(१) अंतर्गत स्थावर तारण मत्तेच्या विक्रीसाठी पंधरा दिवसांची सूचना

प्रति,

कर्जदाराचे नाव : १) श्री. विठ्ठल महादेव रोडे आणि श्री. बाळासाहेब विठ्ठल रोडे (सह-कर्जदार)

हमीदाराचे नाव :- सौ. पुष्पा विठ्ठल रोडे (हमीदार) आणि श्री. नितीन नाथा गव्हाणे (हमीदार)

निवासी पत्ता : पोस्ट : सारोळा कासार, ता. नगर, जि. अहिल्यानगर, पिन - ४१४००५

संदर्भ : सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट-२००२ सह सिक्युरिटी (एन्फोर्समेंट) नियम-२००२ च्या नियम ८(६) मधील तरतूद अन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार(रां)ना आणि हमीदार(रां)ना सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मिळकत जी तारण धनकोकडे गहाण/प्रभारित आहे आणि ज्याचा अन्वयिक/सांकेतिक/प्रत्यक्ष कब्जा सेंट्रल बँक ऑफ इंडिया (तारण धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे, ती ''जे आहे जसे आहे'', ''जे काही आहे'' आणि ''जसे उपलब्ध आहे'' या तत्त्वावर दिनांक **२०.०८.२०२६** रोजी ऑनलाइन पोर्टल https://www.ebkray.in किंवा https://www.baanknet.com द्वारे **(१) श्री. विठ्ठल महादेव रोडे (कर्जदार) आणि श्री. बाळासाहेब विठ्ठल रोडे (सह-कर्जदार)** यांच्याकडून तारण धनको बँकेस येणे असलेल्या रु. ०५,२४,३२४/- + व्याज आणि प्रभार (रुपये पाच लाख चोवीस हजार तीनशे चोवीस फक्त) अधिक त्यावरील व्याज आणि शुल्काच्या वसुलीसाठी विक्री करण्यात येणार आहे.

राखीव किंमत रु. ०९,०४,५००/- (रुपये नऊ लाख चार हजार पाचशे फक्त) आणि इसारा अनामत रक्कम रु. ९०,४५०/- आणि बोली वाढ रक्कम रु. २०,०००/- असेल.

स्थावर मिळकतीचे वर्णन

मिळकतीचे मालक : श्री. विठ्ठल महादेव रोडे (कर्जदार) आणि सौ. पुष्पा विठ्ठल रोडे (हमीदार)

मिळकतीचे वर्णन :

निवासी घर क्र. ४२८, मोजमापित क्षेत्र ६५.२ चौ. मीटर, गाव सारोळा कासार ग्रामपंचायत येथे स्थित, तालुका नगर, जि. अहिल्यानगरचे सर्व ते भाग आणि विभाग.

सीटीएस क्र.	पूर्व	पश्चिम	उत्तर	दक्षिण
घर क्र. ४२८	त्र्यंबक काळे यांची मिळकत	विजय मुनोत यांची मिळकत	ग्रामपंचायत रस्ता	ग्रामपंचायत रस्ता

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी, कृपया तारण धनकोच्या वेबसाईट www.centralbankofindia.co.in/eauction मध्ये दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

प्राधिकृत अधिकारी
सेंट्रल बँक ऑफ इंडिया
दिनांक: ३०.०७.२०२६ प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर

IDBI BANK

आयडीबीआय बँक लिमिटेड, .
दोस्ती पिनॅकल, तळमजला, प्लॉट क्र. ई-७, रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, एमआयडीसी, ठाणे (पश्चिम), ठाणे ४००६०४.

(नियम ८(१))
कब्जा सूचना
(स्थावर मिळकतीकरीता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी आयडीबीआय बँक लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून पुढील कर्जदारांना सूचनेतील नमूद रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यास सांगितले होते. रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा ताबा त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रुल २००२ च्या रुल ८ सहवाचता ॲक्टचे कलम १३ चे उप-कलम (४) अन्वये घेतला आहे. तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत ॲक्टचे कलम १३ चे उप-कलम (८) च्या तरतुदी नुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा आयडीबीआय बँक लिमिटेड च्या खालील नमुद रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या भाराअधीन राहील.

कर्जदाराचे / हमीदाराचे नाव	१३(२) ची तारीख सूचना	मागणी सूचनांमध्ये दावा केलेली रक्कम (रु.)	सांकेतिक कब्जाची तारिख	मिळकतीचा पत्ता
रेनॉय अँटनी अँब्रोस आणि कला अँटनी अँब्रोस	२०.०५.२०२६	रु. ३६,३२,७२९/-	२९.०७.२०२६	फ्लॅट क्र. १०६, १ला मजला, बिल्डिंग क्र. १, ओम साई हाइट्स, पाले गाव रोड, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१

सही/-
ठिकाण : ठाणे प्राधिकृत अधिकारी,
दिनांक : ३१.०७.२०२६ आयडीबीआय बँक लि.

50+ YEARS OF MOMENTUM | अर्थ सहकारेण कल्याणम् | THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED BANK

HEAD OFFICE - "Kalyanam_astu", Om Vijaykrishna Apartment, Adharwadi Road, Kalyan (W), Dist. Thane-421 301

कब्जा सूचना

ज्याअर्थी, दि कल्याण जनता सहकारी बँक लि. च्या प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरीटाईझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शीयल असेटस ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ चे कलम १३(१२) व सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ चा नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन सिक्युरीटाईझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शीयल असेटस ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ चे कलम १३(२) अन्वये दि. १०.०५.२०२२ रोजी **१) कर्जदार मे. साईबाबा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल प्रोप्रा. श्री. दिनेश सुकदेव डोळे** व्यवसाय पत्ता- श्रद्धा कॉम्प्लेक्स, गोठेघर नाका, मुंबई - नाशिक हायवे, शहापुर, जि. ठाणे **२) जामिनदार सौ. वैशाली दिनेश डोळे** - रहाणार ए- १०३, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, सिद्धेश्वर हॉस्पीटलच्या वर, टिटवाळा (प.) जि. ठाणे-४२१६०५ **३) जामिनदार डॉ. लक्ष्मण बन्सी वाघमारे** - रहाणार फ्लॅट क्र. २०२, प्रमुख को. ऑप. हौ. सो. लि.. प्लॉट नं. ६४ बी, सेक्टर- २१, खारघर, नवी मुंबई- ४१०२१० **४) जामिनदार सौ. संगीता लक्ष्मण वाघमारे** - रहाणार फ्लॅट क्र. २०२, प्रमुख को. ऑप. हौ. सो. लि.. प्लॉट नं. ६४ बी, सेक्टर- २१, खारघर, नवी मुंबई- ४१०२१० **५) जामिनदार श्री. राजेश सुकदेव डोळे** - रहाणार फ्लॅट क्र. सी-४०२, शिवम मॅजेस्टीका, चौधरी पार्क, वाकड, जि. पुणे- ४११०५७ **६) श्रीमती. कलाबाई सुकदेव डोळे सहकर्जदार श्री. सुकदेव शंकर डोळे (आता मयत)** यांचे कायदेशीर वारस रहाणार फ्लॅट क्र. ५६-बी, मायादेवी नगर, महाबल रोड, जलगांव- ४२५००१, **७) डॉ. दिनेश सुकदेव डोळे सहकर्जदार श्री. सुकदेव शंकर डोळे (आता मयत)** यांचे कायदेशीर वारस रहाणार ए- १०३, सिद्धेश्वर **कॉम्प्लेक्स**, सिद्धेश्वर **हॉस्पीटलच्या वर, टिटवाळा (प.) जि. ठाणे-४२१६०५ ८) श्री. राजेश सुकदेव डोळे सहकर्जदार श्री. सुकदेव शंकर डोळे (आता मयत)** यांचे कायदेशीर वारस रहाणार फ्लॅट क्र. सी-४०२, शिवम मॅजेस्टीका, चौधरी पार्क, वाकड, जि. पुणे- ४११०५७ **९) श्री. हृषीकेश सुकदेव डोळे सहकर्जदार श्री. सुकदेव शंकर डोळे (आता मयत)** यांचे कायदेशीर वारस - रहाणार फ्लॅट क्र. बी-४०२, सना पॅरेडाईज़, वाकड, थेरगांव, जि. पुणे- ४११०३३ यांना मागणी नोटीस जारी करुन नोटीसीमध्ये नमूद रक्कम **रु. २,६२,९९,२००.०१** (रुपये दोन कोटी बासष्ट लाख नव्याण्णव हजार दोनशे पैसे एक मात्र) अधिक दि. ०१.०५.२०२२ पासूनचे व्याज व इतर खर्च या रकमेची परतफेड नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात करण्याची सूचना दिली होती.

सदर रकमेची परतफेड करण्यास कर्जदार, जामिनदार व वर उल्लेख केलेल कायदेशीर वारसदार असमर्थ ठरल्याने कर्जदार, जामिनदार व वर उल्लेख केलेल कायदेशीर वारसदार तसेच सर्व सामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, मे. अतिरीक्त मुख्य न्याय दंडाधिकारी-४, अलिबाग यांनी केस क्र. क्रिमिनल एम ए / ६९१ / २०२५ मध्ये जारी केलेल्या दि. ०८.१२.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे मे. कोर्ट कमिशनर ॲड स्वरांगी अजित तोलकर यांनी आज दि. २८.०७.२०२६ रोजी खालील वर्णनांकीत तारण मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेऊन तो निम्नस्वाक्षरीकाराकडे दिला आहे.

यासंदर्भात कर्जदार, जामिनदार व वर उल्लेख केलेल कायदेशीर वारसदार यांना विशेषत: व सर्व सामान्य जनतेला या कब्जा सूचनेद्वारे इशारा देण्यात येतो की, खाली नमूद मिळकतीसंदर्भात कोणताही व्यवहार करु नये. त्याचप्रमाणे असा कोणताही व्यवहार झाल्यास / केल्यास तो दि कल्याण जनता सहकारी बँक लि. यांच्या वर नमूद भाराअधीन राहील.

मालमत्तेचे वर्णन

फ्लॅट क्र. २०२, **क्षेत्रफळ ५९.८५ चौ. मीटर्स (कारपेट) व बाल्कनी/ ओपन टेरेस क्षेत्रफळ १५.८० चौ. मीटर्स, दुसरा मजला,** प्रमुख को. ऑप. हौसिंग् सोसायटी लि., सीटीएस / सर्व्हे नं. ६४ बी, व्हिलेज खारघर, सेक्टर २१, रजिस्ट्रेशन डीस्ट्रीक्ट रायगड, सब डीस्ट्रीक्ट पनवेल, मालक **डॉ. लक्ष्मण बन्सी वाघमारे व सौ. संगीता लक्ष्मण वाघमारे.**

स्थळ - खारघर (श्री. प्र. शं. रानडे)
दिनांक - २८.०७.२०२६ प्राधिकृत अधिकारी

Bank of India
Relationships beyond banking

नाशिक झोनल ऑफिस: प्लॉट क्र. जी १, त्रंबकेश्वर रोड, सातपूर इंडस्ट्रियल एरिया, सातपूर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

२५/०८/२०२६ रोजी स. ११.०० ते सायं. ०५.०० (भाप्रवे) दरम्यान बँकेकडे प्रभारित जंगम आणि स्थावर मिळकतीचा ई-लिलाव आणि १५ दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ६(२) आणि ९(१) अन्वये जंगम आणि स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: खालील कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या जंगम आणि स्थावर मिळकती या तारण धनकोकडे गहाण/प्रभारित आहेत, ज्यांचा सांकेतिक/प्रत्यक्ष कब्जा बँक ऑफ इंडिया (तारण धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या खालील नमुद कर्जदार आणि हमीदार यांच्याकडून तारण धनकोंना थकीत रकमेच्या वसुलीसाठी खालील नमुद तारखेरोजीस **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे ''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने विकण्यात येणार आहेत.

अ. क्र.	शाखेचे नाव आणि कर्जदार/ हमीदारांचे नाव आणि पत्ता आणि थकबाकी रक्कम	मिळकतींचे संक्षिप्त वर्णन	राखीव किंमत इएमडी (रु. लाखात)
१.	**शाखा : आडगाव नाका** **खाते:** राजराणी स्टील कास्टिंग प्रायव्हेट लिमिटेड संचालक: १) श्री. नरेंद्र मिठाईलाल अग्रवाल २) श्री. अरविंद मिठाईलाल अग्रवाल **पत्ता :** प्लॉट क्र. डी-१३०/१३१, गट क्र. ५२, मालेगाव एमआयडीसी, सिन्नर, नाशिक ४२२१०३, महाराष्ट्र.	निवासी बिगरशेती जमीन व इमारत, प्लॉट क्र. १४, क्षेत्र मोजमापीत ६७० चौ. मीटर, सौ. नीलम अरविंद अग्रवाल आणि श्री. अरविंद मिथाईलाल अग्रवाल यांच्या मालकीची, सर्व्हे क्र. ५७४/२ (अंतिम प्लॉट क्र. ६९) आणि सीटीएस क्र. ७२०४ मधून, प्लॉट क्र. १४ वर बांधलेले तळमजला + दोन मजले असे ४४०.२०५ चौ. मीटर (चटई क्षेत्र), ६१७.२४५ (बांधकाम क्षेत्र), बांधकाम असलेली, डॉ. होमी भाभा नगर, मुंबई नाका, नाशिक शहर ४, ता. व जि. नाशिक ४२२०११ येथे स्थित असलेली मिळकत. सीमा: उत्तर: २५ फूट रोड | दक्षिण: सर्व्हे क्र. ५७५ | पूर्व: प्लॉट क्र. १५ | पश्चिम: ओपन स्पेस मागणी सूचनेची तारीख: ३०.०३.२०२६ | ताब्यात घेतल्याची तारीख: ०४.०६.२०२६ | ताब्यात घेण्याचा प्रकार: सांकेतिक • **ईएमडी रक्कम देय आहे: /खाते क्र. / आयएफएससी कोड इत्यादींच्या नावे द्यावयाची ईएमडी रक्कम: बँक ऑफ इंडिया, आडगाव नाका शाखा, खाते क्रमांक ०८१०९०२००००००३३, आयएफएससी: बीकेआयडी०००००८१०** • **अधिकृत अधिकाऱ्याचे ई-मेल आयडी/संपर्क क्रमांक: AdgaonNaka.Pune@bankofindia.bank.in /९९०४७७४८५८**	६७८.४८ ६७.८५
२.	**शाखा : आडगाव नाका** **खाते:** राजराणी स्टील कास्टिंग प्रायव्हेट लिमिटेड संचालक: १) श्री. नरेंद्र मिठाईलाल अग्रवाल २) श्री. अरविंद मिठाईलाल अग्रवाल **पत्ता :** प्लॉट क्र. डी-१३०/१३१, गट क्र. ५२, मालेगाव एमआयडीसी, सिन्नर, नाशिक ४२२१०३, महाराष्ट्र.	निवासी बिगरशेती मिळकत, प्लॉट क्र. १५, क्षेत्र मोजमापीत ६८५.७५ चौ. मीटर, सौ. स्वाती नरेंद्र अग्रवाल आणि श्री. नरेंद्र मिथाईलाल अग्रवाल यांच्या मालकीची, सर्व्हे क्र. ५७४/२ (अंतिम प्लॉट क्र. ६९) व सीटीएस क्र. ७२०४ मधील, डॉ. होमी भाभा नगर, मुंबई नाका, नाशिक शहर ४, ता. व जि. नाशिक ४२२०११ येथे स्थित असलेली मिळकत. सीमा: उत्तर: २५ फूट रोड | दक्षिण: सर्व्हे क्र. ५७५ | पूर्व: ३० फूट कॉलनी रोड | पश्चिम: प्लॉट क्र. १४ मागणी सूचनेची तारीख: ३०.०३.२०२६ | ताब्यात घेतल्याची तारीख: ०४.०६.२०२६ | ताब्यात घेण्याचा प्रकार: सांकेतिक • **ईएमडी रक्कम देय आहे: /खाते क्र. / आयएफएससी कोड इत्यादींच्या नावे द्यावयाची ईएमडी रक्कम: बँक ऑफ इंडिया, आडगाव नाका शाखा, खाते क्रमांक ०८१०९०२००००००३३, आयएफएससी: बीकेआयडी०००००८१०** • **अधिकृत अधिकाऱ्याचे ई-मेल आयडी/संपर्क क्रमांक: AdgaonNaka.Pune@bankofindia.bank.in /९९०४७७४८५८**	४९१.११ ४९.११

अटी आणि शर्ती:

(१) ई-लिलाव हा सर्व ज्ञात अज्ञात भारांसह **''जे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे, जे काही आहे तेथे आहे आणि कोणत्याही मदतीशिवाय तत्वाने''** करण्यात येईल आणि बँक मत्तेला बाधीत नामाधिकार, शर्ती किंवा कोणत्याही अन्य वस्तुस्थितीसाठी जबाबदार राहणार नाही. वर दर्शवलेला तपशील हा बँकेकडील उपलब्ध माहितीनुसार दर्शविलेला आहे. लिलाव बोलीदारांने मालमत्तेचे प्रत्यक्ष मोजमाप आणि स्थितीबाबत स्वतःची खात्री करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष आणि मोजमाप आणि स्थितीमध्ये फरक असु शकतो आणि प्राधिकृत अधिकारी त्यासाठी जबाबदार राहणार नाही. लिलाव विक्री/बोली फक्त वेबसाईट **https://www.baanknet.com** मार्फत ''ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बोली'' प्रक्रियेमार्फत करण्यात येईल. **(२)** इएमडी रक्कम जनरेट केलेल्या चलानद्वारे पीएसबी अलायन्स ई-ऑक्शन पोर्टलला थेट जमा करायची आहे. ईएमडी वॉलेटमध्ये बोलीमध्ये सहभागी होण्यासाठी ई-लिलाव प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी इअर रक्कम दिसणे आवश्यक आहे. **(३)** लिलावाची तारीख आणि वेळ २५/०८/२०२६ रोजी स. ११.०० ते सायं. ५.०० (भाप्रवे) दरम्यान. प्रत्येकी १० मिनिटांचा अमर्याद विस्तार **(४)** लिलाव वरील नमूद राखीव किंमतीला सुरू होईल. बोलीदारांनी त्यांचे प्रस्ताव रु. १०,०००/- ते रु. ५०,०००/- च्या पटीत वाढविणे आवश्यक आहे. **(५)** इच्छुक बोलीदारांने वैध ई-मेल आयडी धारक करणे आणि पोर्टल **https://www.baanknet.com** येथे त्यांचे नाव नोंदविणे आणि एमएसटीसीकडून विनामूल्य युजर आयडी आणि पासवर्ड मिळविणे आवश्यक आहे, त्यानंतर त्यांना ऑनलाईन ई-लिलावामध्ये सहभागी होण्याची परवानगी देण्यात येईल. **(६)** संभाव्य बोलीदार पीएसबी अलायन्स ई-ऑक्शन पोर्टल द्वारे ईमेल **support.baanknet@psballiance.com** आणि कॉल सेंटर मुंबई +९१ ८२९१२२०२२० ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात. **(७)** राखीव किंमतीच्या १०%ची इसारा अनामत रक्कम (ईएमडी) चलान जनरेट करून पीएसबी अलायन्स ई-ऑक्शन पोर्टल कडे ती जमा करण्यासाठी आरटीजीएस/एनईएफटी/युपीआय ॲप्लिकेशन मार्फत देय आहे. **(८)** बोली प्रपत्र हे सादर करण्याची अंतिम तारीख किंवा पूर्वी सदर सूचनेच्या अटी आणि शर्तींची स्वीकृती, आणि इएमडी भरणा केल्याचा तपशील (युटीआर क्र.), आयकर विभागाने जारी केलेल्या पॅनकार्डची प्रत आणि बोलीदारांच्या ओळखीचा पुरावा आणि निवासाचा पुरावा जसे की, पासपोर्ट, इलेक्शन कमिशन कार्ड, रेशन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स इ., सह ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. **(९)** इएमडी रक्कम उच्चतम/यशस्वी बोलीदारांच्या प्रकरणात समायोजित करण्यात येईल, अन्यथा विक्री निश्चित झाल्यावर ई-वॉलेटमध्ये परत करण्यात येईल. इएमडी वर व्याज देय नाही **(१०)** इच्छुक पक्षकार साधारण २१.०८.२०२६ स. ११.०० ते दु. ५.०० दरम्यान प्रत्यक्ष ठिकाणी, मत्तेचे निरिक्षण करू शकतात. मत्तेच्या निरीक्षणासाठी कृपया संबंधित शाखेत संपर्क करावा **(११)** उच्चतम/यशस्वी बोलीदारांने अधिकाऱ्यांनी बोली स्वीकारल्यावर मिळकतीच्या समोर नमुद केलेल्या संबंधित शाखेत पुढील कामकाजाच्या दिवसापूर्वी/त्वरित अगोदर जमा केलेली इएमडी समायोजित करून विक्री किमतीच्या २५% टक्के जमा करणे आवश्यक आहे आणि विक्री किंमतीच्या उर्वरित ७५% विक्रीपासून १५ दिवसांत किंवा पूर्वी किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वतःच्या निर्देशाने आणि लेखी मान्य केलेल्या वाढीव कालावधीत जमा करायची आहे. यशस्वी बोलीदारांने प्रदानात कसूर केल्यास बोलीदाराने अगोदर जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि कसूरवार बोलीदाराचा मत्ता/रकमेच्या संदर्भात कोणताही दावा राहणार नाही **(१२)** उच्चतम बोलीदाराना येथील नमूद मत्तेचे यशस्वी बोलीदार/खरेदीदार म्हणून घोषित करण्यात येईल भाग ते बोलीसाठी कायद्याने पात्र असावेत **(१३)** सदर सूचनेत काहिही घटीत नाही किंवा वरील मत्ता विक्रीसाठी बँकेच्या वतीने कोणतेही आश्वासन किंवा सादरीकरण मानण्यात येई नये. बँक/प्राधिकृत अधिकाऱ्यांना कोणतेही कारण न देता योग्य वाटलेल्या कारणांसाठी विक्री रद्द करण्याचा हक्क राखुन ठेवला आहे. आणि अशा रद्द करण्याबाबत बोलीदाराला प्रश्न विचारता येणार नाही. **(१४)** खरेदीदारांने मुद्रांक शुल्क/अतिरिक्त मुद्रांक शुल्क/हस्तांतर प्रभार, शुल्क इ. आणि सर्व सांविधिक/असांविधिक थकबाकी, कर, अभिहस्तांकन प्रभार, शुल्क इ. कोणांचीही देणी सुद्धा भरायची आहे. **(१५)** इच्छुक बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी मत्तेला बाधीत दावे/हक्क/थकबाकी आणि लिलावासाठी ठेवलेल्या मत्तेचे नामाधिकार, भारांच्या संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे. मत्ता बँकेला ज्ञात सर्व विद्यमान आणि भविष्याती भारांसह विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/थकबाकी यासाठी कोणत्याही मार्गाने जबाबदार राहणार नाहीत. **(१६)** बँकेला यशस्वी बोलीदाराने केलेले विक्री मोबदल्याचे प्रदान हे इन्कम टॅक्स ॲक्ट, १९६१ च्या कलम १९४-१ए अंतर्गत टीडीएसच्या अधिन राहील आणि टीडीएस हा बोली रकमेच्या उर्वरित ७५% जमा करतेवेली फक्त यशस्वी बोलीदारांने भरायचा आहे लागु नसल्यास रद्द करावे. **(१७)** विक्रीसाठी प्रस्तावित मत्तेच्या विक्री मधून कोणताही वाद/तफावत उद्भवल्यास फक्त औरंगाबाद येथील न्यायालय/न्यायाधिकरणाच्या अनन्य अधिकरितेच्या अधिन राहील. **(१८)** बोलीदारांना नोंदणी आणि बोली मार्गदर्शनाकरिता **https://www.baanknet.com** ला भेट देणे आवश्यक आहे **(१९)** सूचनेचा इंग्रजी मजकुर आणि मराठी मजकुरात कोणतीही तफावत किंवा विसंगती आढळल्यास इंग्रजी मजकुर ग्राह्य धरावा.

सरफैसी ॲक्ट २००२ च्या नियम ६(२) आणि ९(१) अन्वये १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना

कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांना ई-लिलावाच्या तारखेपूर्वी वरील नमूद रकमेसह व्याज, इतर प्रभार आणि अनुषंगिक खर्च चुकता करण्यासाठी याद्वारे सूचित करण्यात येईल, कसूर केल्यास, मत्तेचा लिलाव/विक्री करण्यात येईल आणि उर्वरित थकबाकी काही असल्यास, व्याज आणि खर्चासह वसुल करण्यात येईल.

विशेष माहिती/सावधानी

शेवटचे मिनिट/सेकंदाला बोली करणे त्यांच्या स्वतःच्या हितासाठी बोलीदारांनी टाळावे अशा वेळी विक्रेत्यांच्या वतीने बँक ऑफ इंडिया किंवा सेवा पुरवठादार कोणतीही उणिव/कमतरता (इंटरनेट फेल्युअर, पॉवर फेल्युअर इ.) साठी जबाबदार राहणार नाहीत. या बाबतीत अशा आकस्मित घटना टाळण्यासाठी बोलीदार बॅक अप पॉवर सप्लाय आणि कोणतीही अन्य आवश्यक व्यवस्था/पर्याय करण्याची विनंती करण्यात येत आहे, जेणेकरुन त्यांना अशा आकस्मित घटना टाळुन यशस्वीपणे लिलावात सहभागी होणे शक्य होईल.

दिनांक : ०१/०८/२०२६ सही/-
ठिकाण : नाशिक प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ इंडिया

जाहिर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, माझे अशील श्री. मनोज कनाबार, कार्यालय ६१७, ६ वा मजला, ताडदेव एअर कंडिशन मार्केट, ताडदेव रोड, मुंबई-४०००३४ येथे असून, त्या श्रीमती फरीदा एरूच मेहता, रा. करीम बिल्डिंग, तिसरा मजला, मौलाना शौकत अली रोड, ग्रँट रोड, मुंबई-४००००७, यांच्याशी खालील सदर संदर्भित परिशिष्टमध्ये वर्णन केलेल्या प्लॉटवरील हक्क संपादन करण्यासाठी वाटाघाटी करीत आहेत. ही खरेदी श्री. कायोमेई कोवास पलिया, 'अवर टाउन' या संस्थेचे एकमेव मालक, ज्यांचा व्यवसायाचा पत्ता:- १०, एव्हेरेस्ट बिल्डिंग, ताडदेव, मुंबई-४०००३४ आहे, यांच्या पुष्टीकरणासह करण्यात येणार असून, सदर प्लॉट सर्व बोजांपासून मुक्त, स्पष्ट व विक्रीयोग्य मालकीहक्कासह, वैध मोबदल्याकरिता खरेदी करण्यात येणार आहे.

सदर प्लॉटमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागात भाडेकरार, गहाण, भार, धारणाधिकार, भाडेपट्टा, वापर, विश्वस्त व्यवस्था, ताबा, वारसा, सुखभोगाधिकार, लीव्ह अँड लायसन्स किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, हक्क, हिस्सा, मालकीहक्क किंवा स्वारस्य असलेल्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ; संबंधित कायदेशीर कागदपत्रांसह आपला दावा अधोहस्ताक्षरी यांना कार्यालय : तिसरा मजला, क्रेसेंट चेंबर्स